# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
ई मेल - sec.zpps@mah.gov.in
दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ नप-२०१६/
प्र.क्र.३१/का-६, दि. १४ ऑक्टोबर, २०१६.

ज्याअर्थी, भारतीय संविधानामध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार प्रत्येक राज्यात अनुच्छेद २४३-के व अनुच्छेद २४३-झेडए नुसार राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली असून राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.५७५६/२००५ (श्री. किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) या याचिकेमध्ये दि.१९/१०/२००६ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोग यांचे अधिकार, शक्ती व दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या समकक्ष आहेत.

२. ज्याअर्थी, पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-२७०/१९९७ श्री. हरबन्सलाल जलाल विरुध्द भारत सरकार, भारत निवडणूक आयोग व इतर या दाव्यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाला निवडणुका मोकळ्या वातावरणात व योग्यरितीने व्हाव्यात यासाठी निवडणुकीची अधिसूचना निघण्याच्या पूर्वीपासून आदर्श आचारसंहिता लावण्याचे अधिकार

आहेत व तिचे पालन सर्व राजकीय पक्षांनी करणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पेशन लिव्ह पिटिशन (सिव्हील) क्रमांक- २२७२४/१९९७ यामध्ये भारत सरकार व भारत निवडणूक आयोग यांच्यामध्ये दि.- १६ एप्रिल, २००१ रोजी झालेल्या करारानुसार पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक- २७०/१९९७ मध्ये दिलेल्या आदेशांबाबत पुढे काही आदेश देण्याची आवश्यकता नाही, असे म्हटले आहे.

३. ज्याअर्थी, लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक होणे आवश्यक असल्याने राज्य निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभेसाठी वापरण्यात येणारी आदर्श आचारसंहिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीसुध्दा स्वीकारलेली आहे. याकरिता राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले सर्व आदेश एकत्रित करून आदेश क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६, दि. १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केले होते.

४. ज्याअर्थी, २०१६ पासून झालेल्या नवीन घडामोडी, भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले नवीन आदेश, इत्यादी या सर्व बाबींचा विचार करून वर नमूद दि. १४ ऑक्टोबर, २०१६ चे आदेश रद्द करुन आदर्श आचारसंहितेबाबत सुधारित आदेश काढणे आवश्यक झाले आहे.

५. त्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ,

पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात व्हाव्यात यासाठी यापूर्वीचे दि. १४ ऑक्टोबर, २०१६ रोजीचे आदेश अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१) आदर्श आचारसंहितेचा उद्देश -

आचारसंहितेचे तत्व आणि ती लागू करण्याबाबतचा उद्देश खालीलप्रमाणे आहे:-

(i) शांततापूर्ण आणि नियमबध्द आचरण (Peaceful and orderly conduct)

(ii) समान संधी (Equal opportunity)

(iii) नागरिकांचा शांततेचा अधिकार (Right of citizens to peace)

(iv) प्रचाराकरिता पाळावयाची सभ्यता (Decorum in campaign)

(v) निवडणुकीमधील भ्रष्ट आचरण आणि निवडणूक विषयक गुन्हे प्रतिबंधित करणे (Preventing corrupt practices and electoral offences)

(vi) शासकिय यंत्रणा आणि पदाचा दुरुपयोग यावर प्रतिबंध ( Preventing misuse of government machinery and position of power)

(vii) आचारसंहिता आणि शासन ( MCC and Government )

सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी/कर्मचारी यांनीही कोणताही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षांबाबत) नि:पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

२) आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी-

आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीची जबाबदारी नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायतींकरिता संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिकांकरिता संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील.

जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी आचारसंहितेचे आदेश लक्षात घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी. ज्या बाबींच्या संदर्भात स्पष्टता नसेल अशा बाबींच्या संदर्भात लोकसभा व विधानसभा निवडणुकांबाबत भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना विचारात घ्याव्यात. तसेच जर भारत निवडणूक आयोगाच्या सूचना उपलब्ध नसतील तर राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागवावे.

या आदेशात आचारसंहितेसंदर्भात विविध विषयांबाबत दिलेले निदेशांचे संकलन हे सर्वसमावेशक नाही. राज्य निवडणूक आयोगाने कायदा व सुव्यवस्थेबाबत क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का.७, दि.०४/११/२०२५ अन्वये एकत्रित आदेश दिलेले आहेत. या आदेशांच्या अनुषंगाने आचारसंहितेची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत दक्षता घ्यावी. निवडणुकीच्या प्रक्रीयेमध्ये या आदेशात उदाहरणादाखल दिलेल्या संकलनामध्ये नमूद नसलेली कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाले असेल तर जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व निवडणुकीशी निगडीत संबंधित अधिकाऱ्यांनी राजकीय पक्ष/उमेदवार/अधिकारी-कर्मचारी व इतर यांच्याविरुध्द तातडीने खालील प्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) आदर्श आचारसंहितेअंतर्गत संबंधितांना Reprimand, Censure, Condemnation करावे व आवश्यक तेथे संबंधितांना निर्देश किंवा मार्गदर्शन द्यावे.

(ब) निवडणूकविषयक कायदा व तरतुदीअंतर्गत संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करावेत.

(क) अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यांतर्गत उदा. भारतीय न्याय संहिता, २०२३; सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४; महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, १९९५; प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० इत्यादी अन्वये गुन्हे दाखल करावेत.

निवडणूक ही एक कालबध्द प्रक्रिया आहे, ज्यामध्ये अनेक घडामोडी घडत राहतात. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यावर त्याबाबत अत्यंत तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

३) आदेश अंमलात येण्याचा दिनांक -

हे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच, महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद/पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या या आदेशाच्या दिनांकानंतर होणाऱ्या सर्व निवडणुकांसाठी लागू होतील.

४) आचारसंहितेचे क्षेत्र -

सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी लागू राहील व पोटनिवडणुकीची आचारसंहिता संबंधित प्रभाग किंवा संबंधित निवडणूक विभाग किंवा संबंधित निर्वाचक गण यांच्यापुरतीच लागू असेल.

आचारसंहिता जरी निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रापुरती लागू होणार असली तरी त्या बाहेरील आजूबाजूच्या क्षेत्रात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमामुळे मतदारांवर प्रभाव पडून सदर निवडणुकीवर परिणाम होऊ शकेल, असे कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत. उदा. जिल्हा परिषदेची जर निवडणूक असेल तर जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जरी ते मुख्यालय ग्रामीण क्षेत्रात समाविष्ट होत नसले तरीही तेथे निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांवर प्रभाव पडेल असा कार्यक्रम आयोजित करता येणार नाही. तसेच महानगरपालिका अथवा नगर परिषद / नगरपंचायत क्षेत्रात निवडणूक असताना त्याला लगतच्या ग्रामीण क्षेत्रात असा कार्यक्रम किंवा अशी कृती करता येणार नाही ज्यामुळे महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणूका/मतदारावर परिणाम होईल. त्याशिवाय, संपूर्ण राज्यामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारांवर प्रभाव पडेल असा कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.

५) आचारसंहितेचा कालावधी –

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्याची वेळ व दिनांकापासून ते मतमोजणीच्या निकालापर्यंत लागू राहील. या आचारसंहितेचे सर्वसाधारणपणे दोन टप्पे असतील.

पहिल्या टप्प्यात म्हणजे राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केल्यापासून ते नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याच्या आदल्या दिवसापर्यंत, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबत तसेच या संस्थांनी कोणतेही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे झाल्यास त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. हा धोरणात्मक निर्णय राज्य शासन अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यापैकी कोणीही घ्यावयाचा असल्यास त्यांना हे आदेश लागू होतील.

आचारसंहितेचा दुसरा टप्पा नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यास सुरुवात झाल्यापासून सुरु होईल. नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यास सुरुवात झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. त्यामुळे यासंदर्भातील कोणत्याही स्वरुपाचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येऊ नये. मात्र निवडणुका जाहीर करतेवेळी जी कामे प्रत्यक्ष सुरु असतील ती तशीच पुढे चालू ठेवता येतील.

६) जाहीर प्रचाराचा कालावधी –

जाहीर प्रचारबंदीचा कालावधी विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियम/ नियमात वेगवेगळा नमूद केला आहे. त्यानुसार जाहीर प्रचारबंदीचा कालावधी पुढीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | जाहीर प्रचारबंदीचा कालावधी |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका | मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित केली असल्यास ८ तारखेला संध्याकाळी ५.३० वाजता प्रचार बंद होईल. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी / प्रसारण देखील बंद होईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | नगरपरिषद / नगरपंचायत | मतदान सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान सुरु होत असल्यास ८ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचार बंद होईल. मात्र ८ तारखेला रात्री १०.०० नंतर सभा /मोर्चे / ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी / प्रसारण देखील बंद होईल. |
| ३ | जिल्हा परिषदा/पंचायत समित्या | मतदान सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान सुरु होत असल्यास ८ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचार बंद होईल. मात्र ८ तारखेला रात्री १०.०० नंतर सभा /मोर्चे / ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी / प्रसारण देखील बंद होईल. |
| ४ | ग्रामपंचायत | मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस संध्याकाळी ५.३० वाजेपर्यत मतदानाची वेळ निश्चित केली असल्यास ८ तारखेला संध्याकाळी ५.३० वाजता प्रचार बंद होईल. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी / प्रसारण देखील बंद होईल. |

## सर्वसाधारण वर्तणूक

७) धार्मिक तणाव -

कोणताही पक्ष अथवा उमेदवार, वेगवेगळ्या जाती, धर्म, भाषा अथवा सामाजिक गट यांच्यामध्ये मतभेद होणारी किंवा ज्यामुळे, त्यांच्यात परस्परांमध्ये द्वेष किंवा तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करणार नाही.

८) प्रतिस्पर्ध्यांवरील टीका -

इतर राजकीय पक्षांवर टीका करण्यात येईल तेव्हा ती पक्षांची धोरणे किंवा कार्यक्रम, त्यांचे पूर्वीचे कार्य यांच्यापुरती मर्यादित असेल. पक्षाच्या नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या सार्वजनिक कामांशी

संबंधित नसलेल्या, खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टिका करण्यापासून, पक्ष आणि उमेदवार दूर राहतील. बिनबुडाचे आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका केली जाणार नाही.

राजकीय पक्ष आणि उमेदवारांना एखाद्या व्यक्तीची राजकीय मते वा कामे कितीही नापसंत असली तरी शांत आणि स्वस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक माणसाच्या अधिकारांचा आदर केला जाईल. लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे देणे या उपायांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही.

९) प्रार्थना स्थळांचा वापर -

मते मिळविण्याकरिता धर्म, जात, वर्ग अथवा गट यांच्या भावनांना आवाहन केले जाणार नाही. कोणत्याही प्रार्थनास्थळांचा निवडणूक प्रचाराचे व्यासपीठ म्हणून वापर केला जाणार नाही. तसेच कोणत्याही प्रार्थना स्थळांचा निवडणूक कामासाठी वापर करता येणार नाही. विशिष्ट जाती, जमाती, धर्माच्या सभा घेण्यात येऊ नयेत.

१०) मतदारांना प्रलोभन / धाक -

मतदारांना लाच देणे, वस्तूंचे, पैशाचे, मद्याचे वाटप करणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, मतदारांची तोतयेगिरी, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राजवळच्या १०० मीटर्स क्षेत्रामध्ये प्रचार करणे या बाबी कारवाईस पात्र ठरतील. मतदानापूर्वी जाहीर प्रचार बंद करण्यासंबंधी तरतुदींचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहतुकीची आणि वाहनांची व्यवस्था करणे यासारख्या "भ्रष्टाचाराच्या" आणि निवडणूक कायद्यांतर्गत गुन्हा समजल्या जाणाऱ्या गोष्टी, सर्व पक्ष आणि उमेदवार कटाक्षाने टाळतील. **सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया/प्रिंट मीडियाचा वापर करून**

प्रलोभने किंवा लाच देता येणार नाही. कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी यांनी संपूर्ण आचारसंहितेच्या काळात दारुचे, पैशांचे तथा भेट वस्तूंचे वाटप करू नये.

११) निवडणूक आचारसंहितेमध्ये येणाऱ्या सार्वजनिक सणांमधील आचरणाबाबत -

बऱ्याचदा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत विविध धर्मियाचे महत्वाचे सण येतात. सदर सणानिमित्त बरेच सार्वजनिक कार्यक्रम तसेच सहभोजनाच्या कार्यक्रमाचा समावेश असतो. या सर्व कार्यक्रमामुळे आचारसंहितेस बाधा येऊ शकते काय अशी विचारणा वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थाकडून करण्यात येते. सर्व बाबींचा विचार करुन व सामाजिक सलोखा लक्षात ठेवून विशेष बाब म्हणून राज्य निवडणूक आयोग या कार्यक्रमाबद्दल पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरवून देत आहे.

१) राजकीय पक्षाचे नेते, उमेदवार, कार्यकर्ते या सण / उत्सवाच्या कार्यक्रमामध्ये व्यक्तिगतरित्या सहभागी होऊ शकतात.

(२) सण / उत्सवाच्या एखाद्या मंडळाचे विश्वस्त किंवा पदाधिकारी, उमेदवार म्हणून एखादी राजकीय व्यक्ती असल्यास तिचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर राहू शकते. परंतु, तेथे ते कुठल्या पक्षाशी संबंधित आहे किंवा कुठल्या प्रभागातील / जिल्हा परिषद विभागातील / पंचायत समिती गणातील उमेदवार आहे याचा उल्लेख नसावा.

(३) या सणांमध्ये कोणत्याही राजकीय नेत्याचा/ उमेदवाराचा सत्कार आयोजित करण्यात येऊ नये.

(४) या सण / उत्सवाच्या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्याने अथवा उमेदवाराने कोणत्याही वस्तूंचे वाटप करु नये अथवा त्यासाठी कुठल्याही सार्वजनिक मंडळाचा आधार घेऊ नये.

(५) सण/उत्सव निमित्त लावण्यात आलेल्या पोस्टर्स, बॅनर्सवर उमेदवारांचा फोटो व नाव असू शकेल तथापि, त्या बॅनर्स पोस्टर्स वर प्रचाराचा तसेच निवडणूक चिन्हाचा / पक्षाच्या नावाचा उल्लेख असू नये.

(६) निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये भोजनावळ/जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करु नये.

ही तत्वे सार्वत्रिक निवडणुक असलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात लागू राहील.

१२) मतदान प्रतिनिधी नियुक्तीबाबत

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाची व्यक्ती संबंधित प्रभागात राहणारी असावी व तिला मतदार ओळखता यावेत. ज्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधी नेमावयाचा आहे, त्यांनी मतदान प्रतिनिधी किंवा त्याचा पर्यायी प्रतिनिधी यांची नावे व पत्ते निवडणुकीच्या दिनांकापूर्वी किमान एक दिवस आधी निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवावीत. ज्या व्यक्तींविरुद्ध गुन्हेगारीची नोंद असेल किंवा निवडणूक विषयी गैरव्यवहारात समाविष्ट असल्याची पूर्वीची नोंद असेल किंवा त्यांच्या वर्तणुकीमुळे मतदारांमध्ये दहशत पसरू शकेल अथवा ज्या व्यक्तीचा मतदारांवर प्रभाव पडेल अशा व्यक्तींना मतदान प्रतिनिधी म्हणून नेमू नये.

१३) सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या व्यक्तीस तसेच लोकप्रतिनिधीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी न नेमणेबाबत-

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.२३/का-७, दि. १९ ऑक्टोबर, २०१६ च्या आदेशान्वये सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमता येणार नाही.

१४) राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये करण्यात येणारा खर्च व प्रमुख प्रचारकांच्या (Star Campaigner) प्रवास खर्चास सूट देण्याबाबत -

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक रानिआ/रापनों/२०२४/प्र.क्र.२४ /का.११, दि. ५ मे, २०२५ अन्वये राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांवर प्रचाराकरिता केलेला खर्च कशा प्रकारे विभाजित करावा याबाबत सविस्तर आदेश दिले आहेत. तसेच या आदेशात प्रमुख प्रचारक (Star Campaigner) यांची नांवे कळविण्याची तरतूद आहे. त्यानुसार उमेदवाराच्या खर्चामध्ये केवळ ज्यांची नावे प्रमुख प्रचारक (Star Campaigner) म्हणून कळविण्यात आली आहेत त्यांच्या प्रवासाचा खर्च समाविष्ट होणार नाही. कोणत्याही उमेदवारास स्वतःच्या प्रभागात स्वतःचे नाव प्रमुख प्रचारक म्हणून घोषित करता येणार नाही.

## सत्तारुढ पक्ष / शासनासंबंधी

१५) राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्यापासून कोणतेही मंत्री अथवा इतर प्राधिकारी (शासन/स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी) यांनी -

(क) कोणत्याही प्रकारची वित्तीय अनुदान देण्याची किंवा ती देण्याबाबतची अभिवचने घोषित करता कामा नयेत,

(ख) कोणत्याही प्रकारचे प्रकल्प किंवा योजना यांच्या कोनशिला बसवता कामा नयेत,

(ग) रस्त्यांचे बांधकाम करण्याची किंवा पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादींसाठी तरतूद करण्याबाबत कोणतेही अभिवचन देता कामा नये,

(घ) शासन, सार्वजनिक उपक्रम तथा स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमध्ये कोणत्याही नवीन अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्या करता कामा नये. तसे केल्यास सत्तारुढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाग पाडल्यासारखे होईल.

१६) घोषणा व जाहिराती-

वित्तीय अनुदान किंवा इतर कल्याणकारी योजना घोषित करण्याच्या संबंधात निवडणूक आचारसंहितेच्या आदेशात नमूद करण्यात आल्याप्रमाणे सर्व मनाई आदेश हे निवडणुका घोषित करण्यात आल्यानंतरच लागू होतील याची आयोगाला जाणीव आहे. तथापि, केंद्रातील आणि राज्यातील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तारुढ पक्षांनो निरनिराळया प्रकारच्या कल्याणकारी योजना आणि इतर सवलतींची घोषणा करुन, तसेच सार्वजनिक निधीतून मुद्रित होणाऱ्या किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादीद्वारे केंद्रात आणि राज्यातील शासनाची कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणून देऊन शासन पुरस्कृतरितीने कोणत्याही पक्षाचा प्रचार वाढविण्यासाठी अधिकाराचा वापर करण्यास बंदी राहील.

जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडीयाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत. मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी वृत्तपत्रांमधून तसेच प्रसार माध्यमांद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देण्यात येणार नाहीत याची खबरदारी सर्व उमेदवार व राजकीय पक्षांनी घ्यावी.

१७) जात, धर्म, जमात किंवा भाषा याच्या आधारे आचारसंहिता कालावधीत अधिवेशने घेता येणार नाहीत.

१८) दुष्काळ, पाणी टंचाई, साथीचे आजार, पूर परिस्थिती इत्यादी नैसर्गिक आपत्ती, गंभीररित्या आजारी असलेल्यांना मदत व सुरु असलेल्या योजना पुढे चालू ठेवण्याबाबत –

आचारसंहिता असल्याने एखाद्या ठिकाणी दुष्काळ असेल अथवा पाणी टंचाई असेल तर ती दूर करण्याबाबत कार्यवाही करु नये असा आचारसंहितेचा अर्थ होत नाही. त्यामुळे दुष्काळ, पाणीटंचाई, साथीचे आजार, पूर परिस्थिती इत्यादी नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी कामे करण्यास किंवा अशी आपत्ती निवारणाची कामे हाती घेण्यास कोणतीही बंदी असणार नाही.

मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे; महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांच्या व अन्य निवडणुकांच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने चालू ठेवता येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेचे पालन सर्व संबंधितांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. आचारसंहितेचे पालन याचा अर्थ प्रामुख्याने निवडणुका जाहीर झालेल्या क्षेत्रातील मतदारांवर प्रभाव पाडणारे निर्णय निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षांनी घेऊ नयेत अथवा अशी कोणतीही कृती करु नये असा होतो. पण याच बरोबर हे सुध्दा आवश्यक आहे की, विकास कामांच्या योजना, ज्या सुरु होऊन काही प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत, त्या आचारसंहितेच्या कालावधीत बंद पडू

नयेत. जी कामे निवडणुका जाहीर होण्याआधीपासून प्रत्यक्षरित्या सुरु झाली असतील ती तशीच पुढे सुरु ठेवता येतील.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पोटनिवडणुकांच्यावेळी ज्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद असेल व जे काम एखाद्या विशिष्ट भागांशी संबंधित नसेल असे कोणतेही काम हाती घेण्यास बंदी राहणार नाही. मात्र, ज्या कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद नाही किंवा जी कामे एखाद्या विशिष्ट प्रभागासाठी सुरु होतात त्या कामांची सुरुवात करण्यापूर्वी किंवा त्यासाठी निविदा सूचना काढण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी आवश्यक असेल. सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी फक्त जी कामे आधीपासून सुरु असतील केवळ तीच पुढे सुरु ठेवता येतील.

राज्य निवडणूक आयोगाकडे नवीन कामांना परवानगीची विनंती करताना महानगरपालिकेच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांचे तर इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट मत आवश्यक असेल.

**१९) निवडणुकांचे कामकाज कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे हाताळणे तसेच इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना-**

राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६/का-५, दि.१६/०७/२०२५ च्या आदेशान्वये निवडणुकांचे कामकाज हाताळणारे अधिकारी/कर्मचारी हे कर्तव्यदक्ष व नि:पक्ष असण्याच्या दृष्टीने तसेच निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक रितीने घेण्यामध्ये अडथळा येऊ नये या दृष्टीने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत तरतूद केली आहे. तरी सदर आदेशाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

२०) बदल्या - आचारसंहितेच्या काळात निवडणुकांशी संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करावयाच्या असल्यास त्याला राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. यासंदर्भात

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/१०९५/सी.आर-५/९५/डी-३, दि. १५/०३/१९९५ लागू राहतील. निवडणुकांशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यामध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थामधील अधिकारी / कर्मचारी, पोलिस अधिकारी वा निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी जसे, जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार इत्यादी यांचाही समावेश होतो.

२१) **आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका / भरती करण्याच्या दृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबत –**

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन सेवेत तसेच निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे / महामंडळे सार्वजनिक उपक्रम इ. संस्थामध्ये कायमस्वरुपी, तात्पुरती किंवा कंत्राटी पध्दतीने भरती करण्याच्या दृष्टीने जाहिरात देणे, मुलाखती घेणे इ. करण्यात येऊ नये.

१) आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच शासकीय/ निमशासकीय पदावर कायमस्वरुपी, तात्पुरती किंवा कंत्राटी पध्दतीने भरती करण्याच्या अनुषंगाने लेखी परीक्षेबाबत पत्रे पाठविले असल्यास त्यासाठी लेखी परीक्षा घेण्यास हरकत नाही. मात्र मुलाखती घेणे, निकाल जाहिर करणे व प्रत्यक्ष नेमणुका करणे इत्यादी बाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही.

२) ज्या संस्थाच्या भरती प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चित होऊन ते अगोदरच प्रसिध्द केले असेल अशा प्रकरणी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जाहिरात देऊन:-

i) लेखी परीक्षा, शारिरीक चाचणी, मुलाखत व निकाल जाहिर केला असला तरी ही नियुक्ती पत्र देता येणार नाही.

ii) लेखी परीक्षा, शारिरीक चाचणी, मुलाखत ही प्रक्रिया पूर्ण केली असली तरी निकाल जाहिर करता येणार नाही.

iii) लेखी परीक्षा, शारिरीक चाचणी, मुलाखत, निकाल ही प्रक्रिया पूर्ण होऊन नियुक्ती पत्र देखील देण्यात आले असेल तर अशा प्रकरणी संबंधित उमेदवाराला हजर होण्याची मुभा देण्यास हरकत नाही.

iv) ज्या संस्थानी भरतीसंबंधी वार्षिक कार्यक्रम तयार करुन तो जाहिर केला असल्यास आचारसंहितेच्या अंमल कालावधीमध्ये अशा संस्थाना त्यांच्या वार्षिक कार्यक्रमानुसार जाहिरात, लेखी परीक्षा, शारिरीक चाचणी, मुलाखती इत्यादी टप्पे पार पाडता येतील. मात्र निकाल जाहिर करता येणार नाही अथवा नियुक्तीपत्र देता येणार नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या सेवाभरतीसाठी जर संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) धर्तीवर अगोदरच वेळापत्रक जाहीर केलेले असल्यास, ही अट लागू असणार नाही.

३) ज्या संस्थाचे भरतीचे वेळापत्रक वर नमूद केल्यानुसार अगोदरच निश्चित झालेले नसते अशा प्रकरणी भरती प्रक्रियेचा कोणताही टप्पा सुरु करता येणार नाही.

२२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्वसाधारण सभा व बैठका -

स्थानिक स्वराज्य संस्थेमधील विविध समित्यांच्या (स्थायी समिती, विषय समिती इ.) बैठका ज्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहे, त्या घेता येतील. परंतु नेमणुका, अनुदान, कर्ज अथवा आर्थिक सहाय्य मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये. तसेच मतदारांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडेल असे कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत.

२३) आचारसंहिता कालावधीत नियोजन समितीच्या व अन्य समित्या यांच्या बैठका -

आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रामध्ये नियोजन समितीची व अन्य समित्यांची बैठक घेता येत नाही. तसेच त्या क्षेत्राकरिता कोणतीही नवीन योजना जाहीर करता येत नाही. मात्र दुष्काळ, साथीचे आजार, पाणीटंचाई अथवा नैसर्गिक आपत्ती दूर करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करता येते.

यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ/ग्रापनि/२०१२/प्र.क्र.६/का.८, दि. २१ ऑगस्ट २०१२ अन्वये सविस्तर आदेश जारी केलेले आहेत. अशा नियोजन समिती व अन्य समित्या, ज्यांचे अध्यक्ष / पदाधिकारी लाभाचे पद धारण करणारे असतील त्यांनादेखील हे आदेश लागू राहतील. ज्या समित्यांचे अध्यक्षपद जिल्हाधिकारी अथवा अन्य शासकीय अधिकाऱ्याकडे असेल त्यांना हे आदेश लागू होणार नाहीत. मात्र अशा समित्यांच्या बैठकांकरिता लाभाचे पद धारण करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना बोलविता येणार नाही.

२४) **आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करण्याबाबत -**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करावयाचा झाल्यास त्यामध्ये लोकांकडून नेमणुका, अनुदान, आर्थिक कर्ज किंवा आर्थिक सहाय्य याबाबत प्रस्ताव स्वीकारता येत नाहीत. तसेच मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येत नाहीत, याबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ/ग्रापनि/२०१३/प्र.क्र.५/का.८, दि. ४ मार्च २०१३ अन्वये सविस्तर आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यांचे पालन करुन लोकशाही दिन साजरा करता येईल. लाभाचे पद धारण करणारे पदाधिकारी, इ. यांनी निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीमध्ये लोकशाही दिन साजरा करु नये.

२५) **भूमीपूजन, उद्घाटन व समारंभ-**

निवडणुका जाहीर झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राज्य शासनाच्या/ केंद्र शासनाच्या खर्चाने पूर्ण झालेल्या कामांचे भूमीपूजन व उद्घाटन, समारंभ इत्यादी आयोजित करता येणार नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या अधिपत्याखालील महामंडळांच्या अथवा स्वायत्त संस्थेच्या खर्चातून पूर्ण झालेल्या कामांचा उपयोग जनतेसाठी तात्काळ व्हावा, याद्दष्टीने समारंभ आयोजित न करता देखील पूर्ण झालेली कामे, सक्षम प्राधिकाऱ्याचे पूर्णता प्रमाणपत्र घेऊन जनतेच्या उपयोगासाठी खुली/ सुरू करता येतील. यामध्ये राजकीय व्यक्ती, उमेदवार यांना सहभागी करून घेता येणार नाही. आचारसंहिता एका विशिष्ट क्षेत्रापुरती (जिल्ह्यापुरती किंवा महानगरपालिका/

नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रापुरती) मर्यादित असली तरी आजुबाजूच्या क्षेत्रात अथवा संपूर्ण राज्यामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत संबंधीत निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांवर प्रभाव पडू शकेल असे कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत.

२६) लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant) खर्च करण्यावर निर्बंध-

राज्य निवडपूक आयोगाच्या क्र. रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क्र., दि. ५ ऑक्टोबर, २०१६ च्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या तीन महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून कोणत्याही लोकप्रतिनिधींना त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर स्वेच्छा निधीतून खर्च करता येणार नाही.

## राजकीय पक्ष / उमेदवार यांच्यासंबंधीत

२७) इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचार करणेबाबत-

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का.१०, दि. ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी आदेशानुसार इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी यासंदर्भात महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात अथवा राज्य स्तरावर गठित केलेल्या समितीकडून सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात समितीचे अध्यक्ष व सदस्य कोण राहतील हे निश्चित करण्यात आले आहे. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे तसेच प्रिंट मिडीयाद्वारे देखील प्रचारावर बंदी राहील. यामध्ये मेसेजिंग ॲपस् तसेच सोशल मिडीया, उदा. व्हॉट्स अप, फेसबुक, ट्विटर, इत्यादीचाही समावेश होतो. निवडणूकीच्या कालावधीत इलेक्ट्रॉनिक मिडीयाचा गैरवापर केल्यास, इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे आक्षेपार्ह संदेश प्रसिद्ध केल्यास सायबर गुन्ह्यांचा (बंदी, प्रतिबंध इ.) कायदा २०१५ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार तसेच, संबंधित इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

२८) निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन-

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/मावज-२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि.९/१०/२०२५ अन्वये खालील बाबींच्या अनुषंगाने तरतुदी केल्या आहेत:-

(i) निवडणुकांदरम्यान सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी प्रस्तावित जाहिरातींचे पूर्व प्रमाणन
(ii) पेड न्यूजला आळा घालणे
(iii) सर्व समाज माध्यमांवर जाहिरात प्रसारण / प्रसिध्दी / प्रचार व त्या अनुषंगिक बाबींसंदर्भात कार्यपध्दती निश्चित करणे
(iv) जनमत आणि मतदानोत्तर चाचण्यासंदर्भातील दक्षता
(v) जाहीर प्रचाराची समाप्ती व जाहिरातींची प्रसिध्दी
(vi) आचारसंहितेच्या कालावधीतील शासनाच्या जाहिराती
(vii) राजकीय स्वरुपाच्या मुलाखती व चर्चात्मक कार्यक्रम
(viii) मतदान व मतमोजणी केंद्रावर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी घ्यावयाची दक्षता

उपरोक्त आदेशानुसार जिल्हास्तरावर, महानगरपालिका स्तरावर तसेच राज्यस्तरावर समित्या स्थापन करण्यात येतात. तरी उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने सदर समित्यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन संबंधित समित्यांकडे विहित नमुन्यात अर्ज करुन योग्य त्या परवानग्या घेणे आवश्यक आहे.

२९) खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागांवर बॅनर/फलक लावण्याबाबत -

कोणताही राजकीय पक्ष वा उमेदवार ध्वजदंड उभारण्यासाठी, फलक टांगण्यासाठी, सूचना, भित्तीपत्रके चिकटविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी, बॅनर लावण्यासाठी वगैरे कोणत्याही व्यक्तीच्या जमीन, इमारत, कुंपण इत्यादींचा त्याच्या मालकाच्या लेखी परवानगीशिवाय वापर करणार नाही. तसेच यासंदर्भात संबंधित महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालय अथवा आवश्यकतेनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडूनही परवानगी आवश्यक असेल. (महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, १९९५ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमाचे उल्लंघन केल्यास सदर अधिनियमातील कलमांनुसार संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक असेल.)

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या असलेल्या जागांवर निवडणूक प्रचाराचे बॅनर /फलक लावण्याकरिता परवानगी घ्यावी किंवा कसे याबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त / मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे. अशा ठिकाणी निवडणूक प्रचाराचे फलक / बॅनर लावण्यास परवानगी द्यावयाची असल्यास सर्व उमेदवार अथवा राजकीय पक्षांना समान व न्याय्य पध्दतीने त्याचे वाटप करता येईल. कोणत्याही उमेदवारास / पक्षास झुकते माप दिले जाणार नाही याची खबरदारी घेऊन आवश्यक तर सोडत पध्दतीने असे वाटप करण्यात यावे.

३०) निवडणूक प्रचारासंदर्भात उमेदवाराने भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावण्याबाबत -

निवडणूक प्रचार मोहिमांच्यावेळी राजकीय पक्षांचे व उमेदवारांचे कार्यकर्ते खाजगी व सार्वजनिक इमारतींच्या भिंतीवर निवडणूकविषयक भित्तीपत्रके चिकटवून, घोषणा लिहून, निवडणूक चिन्हे रंगविण्यासाठी भिंतीचा वापर करतात. तसेच या गोष्टी इमारतींच्या मालकांची परवानगी न घेताच केल्या जातात व त्यांना त्या अतिशय त्रासदायक ठरतात. याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेला सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व तसेच खाजगी वा सरकारी मालमत्ता विद्रुपन कायदा, १९९६ खालील तरतुदी पुरेशा परिणामकारक आहेत, वरील प्रकारची अनिष्ट कृत्ये करणाऱ्या पक्षांविरुध्द/व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपीकरणसंदर्भात पत्र क्र.एसईसी/१०९५/सी.आर.२५/९५/आरआर, दि. २१/०१/१९९५ अन्वये दिलेल्या सूचना यासंदर्भात लागू राहतील.

निवडणुका सुरु असलेल्या कालावधीत राजकीय पक्ष वा उमेदवार यांनी त्यांच्या अनुयायांना चिन्हे लावणे, फलक लावणे, नोटीसा चिकटवणे व घोषणा लिहिणे इत्यादींसाठी खाजगी जमीन, इमारती, भिंती इत्यादींचा मालकांच्या लेखी परवानगीशिवाय वापर करण्यास अनुमती देता कामा नये. तसेच राजकीय पक्ष वा उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते यांना कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक इमारतींवर आपली भित्तीपत्रके चिकटविणे, घोषण लिहिणे, आपली निवडणूक चिन्हे रंगविणे अशा प्रकारे विद्रुपित करण्याचे अधिकार नाहीत.

पोस्टर, बॅनर इत्यादीबाबत परवानगी, जाहीर प्रचाराचा कालावधी संपेपर्यंतच्या कालावधीसाठी देण्यात येईल. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सदर साहित्य संबंधित उमेदवार/ पक्षांनी तात्काळ काढून टाकणे आवश्यक राहील. जर त्यांनी असे प्रचार साहित्य जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर काढले नाहीतर त्याबाबत उपरोक्त मालमत्ता विद्रुपीकरण कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा व असे प्रचार साहित्य त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने काढून टाकावे आणि ते साहित्य काढण्याकरिता आलेल्या खर्चाचा समावेश संबंधित उमेदवारांच्या खर्चामध्ये करावा.

निवडणुकांच्या संदर्भात राजकीय पक्ष/उमेदवारांनी संबंधितांची लेखी परवानगी न घेता खाजगी मालमत्तेवर त्यांची भित्तीपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे इत्यादी चिकटवून किंवा लिहून ती मालमत्ता विद्रुपित केली असल्यास त्यांनी सदर भित्तीपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे, पोस्टर्स, बॅनर्स काढून टाकून ती मालमत्ता पूर्ववत करण्याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात.

३१) प्रचारामध्ये प्राणी व पक्ष्यांच्या वापरास प्रतिबंध-

राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२६/का.५, दि. २३ डिसेंबर २०११ च्या आदेशानुसार निवडणूक प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करण्यास बंदी घातलेली आहे. त्यानुसार कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रचाराकरिता प्राण्यांचा वापर करण्यात येऊ नये.

३२) निवडणूक प्रचारामध्ये लहान मुलांचा वापर न करण्याबाबत -

निवडणुकीच्या प्रचाराच्या मिरवणुका तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित कार्यक्रमांमध्ये १४ वर्षाखालील मुलांना सामील करण्यात येऊ नये.

३३) मतदान केंद्रात मंत्र्यांच्या प्रवेशाबाबत -

मतदानाच्या दिवशी मंत्री अथवा राज्यमंत्री यांचा शासकीय वाहनांचा ताफा पोलीस सुरक्षा इत्यादी सोबत घेऊन मतदान केंद्रांना भेटी देत असल्याच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त होतात. वास्तविक पाहता, केंद्र तथा राज्य शासनाच्या मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांनी आपली सुरक्षा

यंत्रणा तसेच शासकीय वाहने इत्यादी घेऊन मतदान केंद्रांना भेटी दिल्यास मतदान करण्यासाठी आलेल्या मतदारांवर प्रभाव पडण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशा प्रकारामुळे निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पडण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री इत्यादींनी त्यांचे नाव ज्या मतदान केंद्रात आहे, अशा मतदान केंद्रात त्यांनी फक्त मतदान करण्यासाठीच प्रवेश करावा. अन्य कोणत्याही मतदान केंद्रात त्यांना प्रवेश देऊ नये अथवा त्यांनी भेट देऊ नये. या सूचनांचे सर्व संबंधितांकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल, याची दक्षता घेण्यात यावी.

३४) मुद्रक व प्रकाशकाचे नाव छापणेबाबत-

प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे.

३५) प्रचार फेरीतील वाहनांबाबत -

प्रचार फेरी किंवा मिरवणुका यामध्ये किती वाहने वापरावीत याबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/जिपपंस-२०१६/ प्र.क्र.३१ /का.७, दि.१२/११/२०१६ अन्वये आदेश दिले आहेत. त्यानुसार महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांकरिता जास्तीत जास्त १० वाहने वापरता येतील. (यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने चारचाकी अथवा तीनचाकी व इतर वाहने दुचाकी असू शकतील) तर ग्रामपंचायत निवडणुकांकरिता जास्तीत जास्त ३ वाहने वापरता येतील. (यामध्ये १ वाहन तीन किंवा चारचाकी व इतर वाहने दुचाकी असू शकतील) राज्य निवडणूक आयोगाने या आदेशांमध्ये प्रचारादरम्यान वाहन वापराच्या अनुषंगाने विविध तरतुदी केल्या आहेत. त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

३६) प्रचार कार्यालयांची संख्या-

राज्य निवडणूक आयोगाने उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केलेली आहे. उमेदवाराने उघडलेल्या सर्व प्रचार कार्यालयांचा खर्च, त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होतो. त्यामुळे किती प्रचार कार्यालये उघडावीत यासंदर्भातील मर्यादा राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का.५. दि.४ फेब्रुवारी २०१२ अन्वये काढून टाकण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रचार कार्यालयांना परवानगी देताना सर्व उमेदवारांना समान तत्वानुसार परवानगी द्यावी. तसेच महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी आणि पोलिस यंत्रणा यांनी सुरक्षितता आणि जागोजागी प्रचार कार्यालये उघडल्यास नागरिकांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेऊन प्रचार कार्यालयांना परवानगी देणे आवश्यक आहे. प्रचार कार्यालये ही सकाळी ६.०० वाजल्यापासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत उघडे ठेवण्याची मुभा राहील.

३७) नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांना सूचना-

निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवारात फक्त उमेदवार, सूचक/अनुमोदक अथवा दोन व्यक्ती यांना परवानगी द्यावी. मिरवणुकीने येत असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयापासून १०० मीटर अगोदर मिरवणूक थांबवावी.

## निवडणूक सभांच्या आयोजनाबाबत

३८) पक्ष/उमेदवारांच्या सभेच्या जागा निश्चित करणे-

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने सभेची जागा निश्चित व वाटप करण्यासाठी नियम/धोरण निश्चित करुन सर्व संबंधितांना अवगत करावे. असे धोरण ठरविताना सर्व पक्ष व उमेदवार यांना न्याय्य पध्दतीने सभेच्या जागांचे वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

३९) सभेच्या परवानगीबाबत-

स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना वाहतुकीचे नियंत्रण करणे आणि शांतता आणि सुव्यवस्था राखणे शक्य व्हावे यासाठी पक्ष किंवा उमेदवारास, कोणत्याही प्रस्तावित सभेची जागा आणि वेळ त्यांना

४८ तास अगोदर कळविणे बंधनकारक असेल. सभेसाठी प्रस्तावित केलेल्या जागेत कोणतेही निर्बंधक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले आहेत किंवा कसे, य बद्दल पक्ष किंवा उमेदवार अगोदर खात्री करुन घेईल, अशा आदेशांमधून काही सूट हवी असल्यास, त्यासाठी अर्ज करुन अशी सूट अगोदर प्राप्त केली जाईल. सभेची परवानगी देताना सर्वांना समान संधी मिळावी आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FIRST COME FIRST SERVED) या तत्वाचा अवलंब करावा.

४०) ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत -

ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यासाठी किंवा प्रस्तावित सभेच्या संदर्भात इतर कोणत्याही सुविधेसाठी परवानगी किंवा लायसन्स मिळवावयाचे असल्यास पक्ष किंवा उमेदवार संबंधित प्राधिकाऱ्याकडे त्यासाठी ४८ तास अगोदर अर्ज करुन अशी परवानगी किंवा लायसन्स प्राप्त करील. तसेच याबाबतचे The Noise Pollution (Regulation and Control) Rules, २००० ची अंमलबजावणी बंधनकारक राहील.

४१) सभेमध्ये अडथळा निर्माण न करणेबाबत -

आपले समर्थक, इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा किंवा मिरवणुका यामध्ये अडथळा निर्माण करीत नाहीत किंवा ते उधळून लावीत नाहीत याची राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी दक्षता घ्यावी. एक राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थक, दुसऱ्या पक्षाने आयोजित केलेल्या सार्वजनिक सभांमध्ये तोंडी किंवा लेखी प्रश्न विचारुन किंवा स्वत:च्या पक्षाची पत्रके वाटून अडथळा निर्माण करणार नाहीत. एक पक्ष सभा घेत असेल अशा ठिकाणी दुसरा पक्ष मिरवणूक घेऊन जाणार नाही. एका पक्षाने लावलेली भित्तीपत्रके दुसऱ्या पक्षाचे कार्यकर्ते काढणार नाहीत. सभेमध्ये अडथळा उत्पन्न करणाऱ्या किंवा इतर मार्गांनी गोंधळ माजविणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्याकरिता सभेचे आयोजक स्वत: अशा व्यक्तींविरुद्ध कारवाई करणार नाहीत. तथापि, कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांची मदत घ्यावी.

## निवडणुकांच्या अनुषंगाने मिरवणुकांच्या आयोजनाबाबत

४२) मिरवणुकीची वेळ व जागा निश्चितीबाबत –

पक्ष किंवा उमेदवार, मिरवणूक सुरू होईल ती वेळ किंवा आणि ती जेथून जाईल तो मार्ग आणि मिरवणूक संपेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्चित करील. कार्यक्रमांमध्ये सहसा बदल होणार नाही. कार्यक्रमाच्यावेळी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती व्यवस्था करावी यासाठी आयोजक त्यांना कार्यक्रमासंबंधी सर्व माहिती आगाऊ पुरवतील. मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागात काही निर्बंधक आदेश जारी असतील तर आयोजक त्याबद्दल खातरजमा करुन घेतील आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यामधून सूट दिली नसल्यास, त्या निर्बंधाचे अनुपालन करतील. वाहतुकीच्या विनियमांचे आणि निर्बंधांचेही काळजीपूर्वक पालन केले जाईल.

४३) वाहतूक नियंत्रणाबाबत –

वाहतुकीची कोंडी होऊ नये किंवा तिला अडथळा होऊ नये अशारितीने मिरवणूक नेण्याची व्यवस्था करण्यासाठी आयोजक आगाऊ उपाययोजना करतील, मिरवणूक जर खूप लांब असेल तर तिचे सोयीस्कर आकाराच्या तुकडयांमध्ये विभाजन केले जाईल, ज्यायोगे काही ठराविक स्थळांवर, विशेषत: मिरवणुकीला चौकांमधून जावयाचे असेल तेव्हा अडकलेल्या वाहतुकीला टप्याटप्याने मोकळे करता येईल आणि वाहतुकीची कोंडी होणे टाळता येईल. मिरवणुकीसंबंधी कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांचे निदेश आणि सल्ला यांचे काटेकोरपणे अनुपालन केले जावे. सभा, मिरवणूक, इ.च्यावेळी उमेदवारांनी / पक्षाने त्यांचे कार्यकर्त अथवा स्वयंसेवक नेमून रहदारीचे नियंत्रण अशाप्रकारे करावे जेणेकरुन सभा अथवा मिरवणुकीचा त्रास सर्वसामान्य जनतेला होणार नाही.

४४) दोन मिरवणुका समोरासमोर येऊ न देणेबाबत –

दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्ष एकाच मार्गावरुन किंवा त्याच्या भागांवरुन साधारणपणे एकाच वेळी मिरवणूक नेण्याचे ठरवित असतील तर आयोजक पुरेसे अगोदर संपर्क प्रस्थापित करतील आणि मिरवणुकी एकमेकांसमोर येणार नाहीत किंवा त्या वाहतुकीला अडथळा करणार नाहीत याद्दष्टीने काय उपाययोजना करावयाच्या ते निश्चित करतील. समाधानकारक

उपाययोजना निश्चित करण्यासाठी स्थानिक पोलिसांची मदत घेतली जाईल, पक्ष या प्रयोजनासाठी पोलिसांशी शक्य तेवढया लवकर संपर्क साधतील.

४५) मिरवणुकीदरम्यान बाळगावयाच्या वस्तूंबाबत -

असामाजिक तत्वांकडून, विशेषत: प्रक्षुब्ध मन:स्थितीत ज्यांचा दूरुपयोग केला जाऊ शकेल अशा, धारदार वस्तू, शस्त्रे किंवा विस्फोटक साहित्य जवळ बाळगता येणार नाहीत. बाळगलेली आढळल्यास ती जप्त करण्यात येतील व कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

४६) प्रतिकृतींच्या वापराबाबत -

इतर राजकीय पक्षांचे, सदस्यांचे किंवा त्यांच्या नेतृत्वाचे प्रतिनिधीत्व करीत असल्याचे समजल्या जाणाऱ्या त्यांच्या प्रतिकृती घेऊन जाणे, त्यांचे जाहीरपणे दहन करणे, बॅनरवरील फोटोला जोडे मारणे हे आणि असे निदर्शनांचे प्रकार कोणत्याही पक्षाकडून किंवा उमेदवाराकडून खपवून घेतले जाणार नाहीत.

४७) प्रचारफेरीतील वाहनांची संख्या व खर्चाबाबत -

प्रचारफेरी किंवा प्रचार मिरवणुकीत महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त १० तर ग्रामपंचायत क्षेत्रात ३ वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचारफेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल तर त्या उमेदवाराने त्या प्रचारफेरीचा येणारा खर्च आपल्या खर्चात समाविष्ट केला पाहिजे. जर प्रचारफेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल तर ती प्रचारफेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून (जिल्हा परिषदेबाबत मतदार गट अथवा पंचायत समितीबाबत मतदार गण) जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

## मतदानाचा दिवस

४८) मतदारांना द्यावयाच्या ओळखचिठ्ठया- उमेदवारांनी मतदारांना पुरविलेल्या ओळखचिठ्ठ्या स्वच्छ पांढऱ्या कागदाच्या आहेत आणि त्यांच्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव नाही याची खातरजमा करुन घेतली जाईल.

४९) उमेदवाराचे तात्पुरते कार्यस्थान (उमेदवार/पक्षामार्फत चिठ्ठी वाटपाकरिता लावण्यात येणारे टेबल) -

पक्षाचे व उमेदवारांचे कार्यकर्ते समर्थक यांच्यामधील संघर्ष आणि तणाव टाळण्याच्या दृष्टीने पक्षांनी आणि उमेदवारांनी मतदान केंद्रापासून १०० मीटर लांब उभारलेल्या तात्पुरत्या कार्यस्थानाजवळ विनाकारण गर्दी होऊ देऊ नये. उमेदवाराच्या तात्पुरत्या कार्यस्थळाच्या भागावर कोणतेही भित्तीपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावलेले असणार नाही. तेथे कोणत्याही खाद्यपदार्थांचे वाटप केले जाणार नाही किंवा गर्दी होईल अशी कोणतीही कृती केली जाणार नाही.

५०) मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत -

मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाचे क्र. एसईसी/जीईएन-१९९८/प्र.क्र.१/का.३, दि. ६ जानेवारी १९९८ च्या आदेशान्वये दिलेल्या निर्बंधाचे अनुपालन करताना सर्व पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते संबधित प्राधिकाऱ्याशी सहकार्य करतील आणि वाहने चालविताना त्यासाठी आवश्यक परवाने मिळवून ते त्या वाहनांच्या दर्शनी भागांवर ठळकपणे लावले जातील. मतदानाच्या दिवशी वापरावयाच्या वाहनांच्या मर्यादेमध्ये बदल करण्यात येत असून त्यानुसार मतदानाच्या दिवशी प्रत्येक उमेदवारास स्वत:च्या किंवा निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी दोन वाहने वापरण्याचा अधिकार असेल. ही वाहने त्याच्या मतदारसंघातच वापरता येतील.

५१) मतदान केंद्रामध्ये प्रचार साहित्य नेण्यावरील निर्बंध - निवडणूक चिन्ह, पार्टीचे/उमेदवाराचे नाव असलेले कोणतेही प्रचार साहित्य उदा. चिन्ह छपाई केलेले टी शर्ट, टोप्या, उपरणे तसेच छापील चिठ्ठया इ. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामध्ये आणता येणार नाही.

५२) मतदान केंद्रात उमेदवाराच्या प्रवेशाबाबत -

उमेदवार/उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी यांना मतदानाचे निरिक्षणासाठी मतदान केंद्राचे आत ३ मतदारांचे मतदान होईपर्यंतच थांबता येईल. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारास / उमेदवाराच्या प्रतिनिधीस पोलीसांमार्फत त्या क्षेत्राच्या बाहेर काढावे. उमेदवारास/उमेदवाराचा निवडणूक प्रतीनिधीस एका केंद्रामध्ये संपूर्ण मतदानाच्या कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा जाता येईल.

५३) मतदारांची ने-आण करण्यास वाहनांच्या वापरास बंदी असल्यास -

कोणत्याही उमेदवारास अथवा पक्षाला मतदारांची ने-आण करण्यासाठी कुठल्याही वाहनाचा वापर करता येणार नाही, असे वाहन आढळल्यास पोलिसांनी ते तात्काळ ताब्यात घ्यावे व नियमानुसार योग्य ती कारवाई करावी.

५४) मतदानाच्या दिवशी वाहनांच्या सर्वसाधारण वापराबाबत -

मतदानाच्या दिवशी सर्व प्रकारच्या वाहनांच्या रहदारीवर बंदी घालून जनतेला गैरसोय होईल असा निवडणूक आयोगाचा कोणताही हेतू नाही. निवडणुकीच्या कामाखेरीज अन्य आवश्यक असलेल्या खऱ्याखुऱ्या प्रयोजनासाठी मतदानाच्या दिवशी पुढील प्रकारची वाहने वापरण्यास निवडणूक आयोगाची परवानगी असेल.

(अ) खाजगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वत:च्या खाजगी वापरासाठी वापरण्यात येणारी खाजगी वाहने. परंतु, निवडणुकीच्या कामाशी त्यांचा कोणताही संबंध नसावा.

(ब) खाजगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वत:साठी किंवा त्यांच्या स्वत:च्या कुटुंबातील व्यक्तीसाठी मतदानाचा हक्क बजावता येण्याकरिता मतदान केंद्रावर जाण्यासाठी खाजगी वाहने. परंतु मतदान केंद्रापासून १०० मीटर त्रिज्येच्या आत अशी वाहने नेता येणार नाहीत.

(क) रुग्णालयातील वाहने, रुग्णवाहिका, दूधगाडया, वॉटर टँकर्स, तातडीच्या वीज पुरवठ्याची वाहने, कामावर असलेल्या पोलिसांची वाहने, निवडणुकीच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांची वाहने यासारख्या अत्यावश्यक सेवांसाठी वापरण्यात येणारी वाहने.

(ड) ठराविक थांब्यावरुन व ठराविक मार्गांनी चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक परिवहन सेवेच्या बसगाडया.

(इ) विमानतळ, रेल्वे स्टेशन, आंतरराज्यीय बस स्थानक, इस्पितळ येथे जाण्यासाठीचा जो प्रवास अनिवार्य ठरत असेल त्यासाठी टॅक्सी, तीन चाकी स्कूटर, रिक्षा इत्यादीचा वापर.

(फ) आजारी किंवा विकलांग व्यक्ती यांनी स्वत:च्या उपयोगासाठी केलेला खाजगी वाहनांचा वापर.

५५) उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करणेबाबत -

नामनिर्देशनपत्र भरल्यापासून ते मतमोजणीपर्यंतच्या कालावधीत प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीवर किती खर्च करावा यासाठी आयोगाने मर्यादा घालून दिलेली आहे. तसेच निवडणुका पार पाडल्यानंतर विहित कालावधीत सदर हिशोब व त्याबाबतचे शपथपत्र संबंधित अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ- २०२३/उनिख/ प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ नुसार विहित केलेल्या रितीने खर्चाचा हिशोब सादर करणार नाहीत अथवा **राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेत खर्च करणार नाहीत असे उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार अनर्हतेस पात्र आहेत.** त्यामुळे यासंदर्भातील सूचनांचे पालन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ४५/का-५, दि. २९/१०/२०२५ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे सुधारीत केली आहे:-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| | महानगरपालिका सदस्य | |
| १ | बृहन्मुंबई | १५,००,००० |
| २ | अ वर्ग ( पुणे व नागपूर ) | १५,००,००० |
| ३ | ब वर्ग ( पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे ) | १३,००,००० |
| ४ | क वर्ग ( कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व वसई-विरार ) | ११,००,००० |
| ५ | ड वर्ग ( उर्वरित १९ महानगरपालिका ) | ९,००,००० |

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये) | |
|---|---|---|---|
| नगरपरिषद / नगरपंचायत | | | |
| | | थेट नगराध्यक्ष | सदस्य |
| ६ | अ वर्ग नगर परिषद (न.प.) | १५,००,००० | ५,००,००० |
| ७ | ब वर्ग (न.प.) | ११,२५,००० | ३,५०,००० |
| ८ | क वर्ग (न.प.) | ७,५०,००० | २,५०,००० |
| ९ | नगर पंचायत | ६,००,००० | २,२५,००० |
| जिल्हा परिषद / पंचायत समिती | | | |
| | जिल्हे | जिल्हा परिषद सदस्य | पंचायत समिती सदस्य |
| १० | ७१ ते ७५ निवडणूक विभाग | ९,००,००० | ६,००,००० |
| ११ | ६१ ते ७० निवडणूक विभाग | ७,५०,००० | ५,२५,००० |
| १२ | ५० ते ६० निवडणूक विभाग | ६,००,००० | ४,५०,००० |
| ग्रामपंचायत | | | |
| | सदस्य संख्या | थेट सरपंच | सदस्य |
| १३ | ७ ते ९ सदस्य | ७५,००० | ४०,००० |
| १४ | ११ ते १३ सदस्य | १,५०,००० | ५५,००० |
| १५ | १५ ते १७ सदस्य | २,६५,००० | ७५,००० |

५६) विश्रामगृहाच्या (शासकीय, निमशासकीय व महामंडळे, स्वायत्त संस्था यांच्या मालकीचे) वापराबाबत -

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये विश्रामगृहाचे (Circuit House/Rest House इ.) वाटप करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे राहतील. विश्राम भवन (Circuit House/Rest House इ.) कसे द्यावे यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी:-

(I) आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासकीय विश्रामगृह, निवडणूक कर्तव्यार्थ असलेले राज्य निवडणूक आयोगातील अधिकारी/कर्मचारी तसेच निवडणुकीशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सर्वोच्च प्राधान्याने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

(II) केंद्राच्या तसेच राज्य शासनाच्या मंत्र्यांना विश्रामगृह (Circuit House/Rest House) देण्यास हरकत नाही. तथापि, मंत्र्यांना आपल्या शासकीय कामकाजासाठी काढलेल्या

दौऱ्याची निवडणुकीच्या कामकाजाशी सांगड घालू नये आणि निवडणुकीच्या कामाकाजासाठी सरकारी यंत्रणा व कर्मचारीवर्ग यांचा वापर करु नये.

(III) विश्रामगृह विश्राम भवन (Circuit House/Rest House) चा वापर फक्त सत्ताधारी पक्ष किंवा त्यांच्या उमेदवारांसाठी असू नये आणि अशा निवासी व्यवस्थेचा वापर इतर पक्षांना किंवा उमेदवारांनाही न्याय्य पद्धतीने उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र, कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला विश्राम भवन, विश्रामगृहे अथवा अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थांच्या इमारतीचा अथवा आवाराचा निवडणुकीच्या मोहिमेसाठी, उमेदवारांच्या मुलाखतीसाठी, बैठकीसाठी अथवा प्रचारासाठी किंवा निवडणुकीशी संबंधित पत्रकार परिषदेसाठी वापर करता येणार नाही. तसा वापर झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा कोणी निदर्शनास आणून दिल्यास महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी व असे प्रकार तात्काळ थांबविण्यात यावेत.

(IV) आचारसंहितेच्या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी/कर्मचारी यांनी निवडणुकीच्या कामासाठी जर विश्रामगृहात आरक्षण केले असेल तर ते कुठल्याही परिस्थितीत रद्द करता येणार नाही. अन्य शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांनी जर आरक्षण केले असेल तर ते राजकीय नेत्यांच्या निवडणूक दौऱ्याकरिता रद्द करता येणार नाही.

(V) निवडणुकीच्या प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर ते निकाल लागेपर्यंत कोणत्याही राजकीय व्यक्तीस / नेत्यास विश्रामगृहाचा वापर करता येणार नाही, राजकीय नेत्यांमध्ये मंत्री, राज्यमंत्री तसेच लाभाचे पद धारण करणारे पदाधिकारी यांचाही समावेश असेल.

५७) शासकीय दौरा, तसेच त्यास जोडून प्रचार दौरा न घेण्याबाबत -

केंद्रीय मंत्री, राज्याचे मंत्री, लाभाचे पद धारण करणारे अन्य पदाधिकारी, आचारसंहिता कालावधीत जर आचरसंहिता लागू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात शासकीय दौऱ्यावर येणार असतील तर त्यांच्या खाजगी सचिवाने असा दौरा का आवश्यक आहे, या स्पष्टीकरणासह महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांना व इतर सर्व निवडणुकांच्या

बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना किमान दोन दिवस आधी कळविले पाहिजे. अशा दौऱ्याला जोडून कोणताही खाजगी किंवा निवडणूक प्रचाराचा कार्यक्रम ठेवता येणार नाही.

५८) शासकीय वाहनांच्या वापराबाबत -

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आचारसंहितेच्या कालावधीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी अथवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी यांच्याकडून दौऱ्यावर असलेल्या मंत्री महोदयांना डी.व्ही. कार देता येणार नाही.

निवडणुकीच्या काळात प्रचार मोहिम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रचार करण्यासाठी शासकीय वाहनांचा वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावयाची आहे. शासकीय वाहनामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, केंद्र व राज्य शासनाचे संयुक्तिक क्षेत्र उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा अथवा पंचायत समित्या, ग्रामपंचायती, पणन मंडळे, सहकारी संस्था, महामंडळे, स्वायत्त संस्था, ज्यामध्ये जनतेच्या पैशांची गुंतवणूक आहे, अशा अन्य कोणत्याही संस्था यांच्या वाहनाचा वापर करता येणार नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या पदाधिकाऱ्यांना वाहनांच्या वापराची परवानगी असते अशा पदाधिकाऱ्यांना आचारसंहितेच्या काळात शासकीय कामासाठी फक्त निवासस्थान ते कामकाजाचे ठिकाण एवढ्याच वापराची परवान्गी असेल. मात्र याचा अर्थ असा नाही की, सदर पदाधिकाऱ्यांची वाहने निवडणुकांच्या कामाकरिता महानगरपालिका आयुक्त अथवा संबंधित जिल्हाधिकारी यांना अधिग्रहित करता येणार नाहीत. नामनिर्देशपत्रे स्वीकारण्यास सुरुवात झाल्यापासून सहकारी संस्था, पणन मंडळे, शैक्षणिक संस्था इत्यादींचीही वाहने वापरण्यावर बंदी असेल. अशा बंदीचे उल्लंघन होताना आढळल्यास ते वाहन ताब्यात घेण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांना असेल. आचारसंहिता कालावधीत पदाधिकाऱ्यांकडून शासकीय वाहन इतर कोणत्याही कामासाठी वापर करणार नाहीत, याची लेखी हमी घेण्यात यावी.

शासकीय वाहनांचा निवडणूक प्रचारकामी गैरवापर झाल्याचे आढळून आल्यास वाहने ज्या शासकीय विभाग प्रमुखांच्या अखत्यारीत आहेत ते व्यक्तीशः जबाबदार राहतील व त्यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी.

आचारसंहितेच्या कालावधीत केंद्र शासनाची, राज्य शासनाची वा इतर सार्वजनिक उपक्रमांची विमाने किंवा हेलिकॉप्टर्स प्रचार दौऱ्याकरिता राजकीय नेत्यांनी वापरण्यावर पूर्णपणे बंदी असेल. राजकीय नेते यामध्ये मंत्र्यांचाही समावेश होतो, भारताचे प्रधानमंत्री मात्र शासकीय विमानाने अथवा हेलिकॉप्टरने प्रवास करु शकतील, सरकारी ब्ल्यु पुस्तकामध्ये ज्या सुरक्षा आवश्यकता प्रधानमंत्र्यांसाठी नियंत्रित केलेल्या आहेत त्या भारताचे प्रधानमंत्री यांना लागू राहतील, तसेच, ज्या व्यक्तींना झेड प्लस सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशा व्यक्तीच्या बाबत भारत निवडणूक आयोगाच्या सूचना लागू राहतील. मात्र, बुलेट प्रुफ वाहनांचा वापर अशासकीय कारणासाठी करण्यात आल्यास सदर वाहन वापरावरील खर्च त्या विशिष्ट व्यक्तीला सोसावा लागेल.

प्रचाराकरिता खाजगी विमाने अथवा हेलिकॉप्टर्स यांचा वापर करता येईल. मात्र त्याचा खर्च पक्षाने करावयाच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता कालावधीत केंद्र शासनाची, राज्य शासनाची वा इतर सार्वजनिक उपक्रमांची विमाने किंवा हेलिकॉप्टर्स प्रचार दौऱ्याकरिता राजकीय नेत्यांनी वापरण्यावर पूर्णपणे बंदी असेल. राजकीय नेते यामध्ये मंत्र्याचाही समावेश होतो.

५९) वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करणेबाबत -

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी./१०९५/३०६/डेक्स-३, दि.०२/०३/१९९५ व क्र.एसईसी/झेडपीपीएस/२०१७/सीआर.४४/डी.७, दि.१८/०७/२०१८ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी हे निवडणुकीच्या कामाकरिता वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करण्याकरिता सक्षम असून सदर आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आदेशात नमूद शिक्षेस पात्र राहील.

## ६०) ध्वजारोहण व शासकीय सण -

आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन अथवा महाराष्ट्र दिन असे दिवस आल्यास ध्वजारोहण करण्यासंदर्भात विचारणा होत असते. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, जिल्हयांमध्ये संबंधित पालकमंत्र्यांनी अथवा महानगरपालिकांमध्ये महापौरांनी, जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरपरिषद / नगरपंचायतीमध्ये त्यांच्या अध्यक्षांनी, पंचायत समितीच्या सभापतींनी व ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांनी, प्रजासत्ताक दिनी, स्वातंत्र्य दिनी अथवा महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण करण्यास हरकत नाही. तथापि, अशा कार्यक्रमांच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच या समारंभात करावयाची भाषणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत या समारंभात निवडणूक प्रचाराविषयी भाषणे करता येणार नाहीत. या सूचना सद्भावना दिन व मराठवाडा दिन अशा अन्य दिवसांसाठीही लागू राहतील.

## ६१) मतदान केंद्राच्या आतील चित्रीकरण -

मतदान केंद्रातील प्रत्यक्ष मतदानाचे, मतदान कक्षाचे तसेच ज्यामुळे मतदानाची गुप्तता भंग होऊ शकते अशा कुठल्याही बाबींचे व मतदान केंद्राच्या आतील भागाचे चित्रीकरण करता येणार नाही.

## पोलीस विभागाशी संबंधित

## ६२) शस्त्रास्त्र बंदी -

निवडणुका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध घालणे आवश्यक आहे. ही बंदी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील व यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी अथवा अन्य संबंधित पोलीस अधिकारी यांच्याकडून काढले जातील, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी घ्यावी. निवडणुकांच्या कालावधीमध्ये शस्त्र जमा करण्याबाबत छाननी समिती गठीत करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१५/सं.क्र.२७९ /

का.५, दि. ०९ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

६३) दारुबंदी -

मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्रीवर बंदी राहील व कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी संपूर्ण आचारसंहितेच्या काळात मद्याचे वाटप करु शकणार नाही. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी /१०९५ /सी.आर.१ /९५ /डेक्स ३, दि. ०७/०३/१९९५ लागू राहतील.

६४) पैशाचा अवैध वापर व मद्याची अवैध वाहतूक -

महानगरपालिका / जिल्हा / तालुका पातळीवर सर्व बँका, पतपेढया इत्यादीशी समन्वय साधून मोठया प्रमाणावर होणाऱ्या पैशाच्या व्यवहारावर लक्ष ठेवावे.

विमानतळ, रेल्वे, उत्पादन शुल्क, वन विभाग, नेव्ही, कोस्टगार्ड, इत्यादी विभागांशी समन्वय साधून पैशाची व मद्याची अवैध मार्गाने होणारी वाहतूक व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे.

६५) ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत -

ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. तसेच रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी राहील. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.एसईसी /१०९५/सी.आर.९/९५/डेस्क-३, दि. १८/०३/१९९५ अन्वये ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत दिलेल्या सूचना लागू राहतील. याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

६६) प्रचार संपल्यानंतर हद्दीमध्ये वास्तव्य न करणेबाबत –

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का-५, दि.०९/०४/२०१० अन्वये प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदार नसलेल्यांना त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वास्तव्य न करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना पोलीस, हद्दीबाहेर हलविण्याबाबतची कार्यवाही करु शकतील.

६७) वाहनांच्या गैरवापराबाबत –

अनिष्ट/अवैध कृत्यांना पायबंद घालण्यासाठी निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे इतर पक्ष नेते यांच्यासोबतच्या व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनांनी बेकायदेशीर दारुगोळा व शस्त्रास्त्रे वाहून नेणे यासारख्या गुन्हेगारी कृत्यांसह कोणत्याही संभाव्य अपकृत्यांवर जिल्हा प्रशासनाने बारीक लक्ष ठेवले पाहिजे. जर या वाहनांपैकी एकतर पक्षाची किंवा खाजगी मालकीची वाहने, अशा कोणत्याही कृत्यामध्ये किंवा मतदारांच्या मनात धाकदपटशा दाखविण्यासाठी किंवा दहशत निर्माण करण्याच्या हेतूने समाजविघातक व्यक्तींची ने-आण करण्यासाठी वापरात असल्याचे दिसून आल्यास अशी वाहने अटकावून ठेवणे आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना मुक्त न करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल. याशिवाय, जे अशा अवैध कृत्यांमध्ये गुंतलेले आहेत असे वाहनांचे मालक, वहिवाटदार आणि उमेदवार/राजकीय पक्ष यांच्या विरुद्धदेखील कायद्यानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल.

## परिशिष्टे

६८) काय करावे किंवा काय करू नये याबाबतची सुची सोबतच्या परिशिष्ट १ मध्ये दिली आहे. सदर सूची केवळ उदाहरणदाखल असून ती सर्वसमावेशक नाही. वरील विषयावरील इतर तपशीलवार आदेश, निदेश/सूचना यांना पर्यायी असणार नाही. त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

६९) निवडणुकीदरम्यान प्रचार, वाहन वापर, सभा, प्रसार माध्यम व जाहिरात प्रमाणन इत्यादीसाठी लागणाऱ्या विविध परवानग्यांकरीता मार्गदर्शक यादी परिशिष्ट २ मध्ये दिली आहे.

(७०)  आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सुलभ संदर्भाकरिता विविध अधिनियम/नियम/ संहिता यामध्ये असलेल्या तरतुदी परिशिष्ट ३ मध्ये दिल्या आहेत.

आचारसंहितेची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावेत. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा. कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग झाल्यास तात्काळ नियमानुसार कार्यवाही करुन त्याचा अहवाल विनाविलंब आयोगास सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

०४.११.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत- परिशिष्ट १ ते ३

प्रति,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय
सर्व विभागीय आयुक्त
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य/ अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/ नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
निवड नस्ती

## परिशिष्ट-१

## काय करावे व काय करू नये

(अ) " काय करावे"

१. चालू असलेले कार्यक्रम/ योजना पुढे सुरु ठेवता येतील.

२. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग/ महानगरपालिका आयुक्त/ जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण / मान्यता प्राप्त करण्यात यावी.

३. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील.

४. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल.

५. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/ निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी नि:पक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/ निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर नि:पक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे.

६. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णत: अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत.

७. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी.

८. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.

९. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात.

१०. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे.

११. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक ( Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे.

१२. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलीसांचे सहाय्य मिळविण्यात यावे.

१३. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी.

१४. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे.

१५. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.

१६. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.

१७. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकर्त्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत.

१८. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही.

१९. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.

२०. राज्य निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य ) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही.

२१. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/ क्षेत्र/ प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

२२. राज्य निवडणूक आयोग/ आयुक्त, महानगरपालिका/ जिल्हाधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/ अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

(ब) "काय करु नये"

१. शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेल:-

(१) केंद्र शासन (२) राज्य शासन (३) केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे (४) केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम (५) स्थानिक स्वराज्य संस्था (६) महानगरपालिका (७) नगर परिषदा/ नगर पंचायती (८) पणन मंडळ (कोणत्याही नावाचे) (९) सहकारी संस्था (१०) जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या/ ग्रामपंचायती (११) ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व (१२) संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलिस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने.

२. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये.

३. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत.

४. शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ (Ad hoc)नियुक्त्या करु नयेत.

५. मंत्री ( राज्यमंत्री व उपमंत्रीसहित ) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत.

६. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम पार पाडण्यात येऊ नये.

७. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.

८. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये.

९. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये.

१०. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये.

११. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.

१२. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये.

१३. लाच देणे, आवजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत.

१४. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये.

१५. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खाजगी जागांचा समावेश असेल.

१६. इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये किंवा मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये.

१७. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये.

१८. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भित्तीपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत. मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे.

१९. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये.

२०. ध्वनिक्षेपकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत, सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी किंवा रात्री १०.०० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये. तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी

२१. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मिरवणुकीत किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकाचा वापर करु नये. अशा सभा/ प्रचारफेरी रात्री १०.०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे तसेच घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टीकोन आणि हवामान, सणासुदीचे दिवस, परिक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील.

२२. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये.

# परिशिष्ट-२

| अ. क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी/ विभाग | परवानगीसाठी करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|
| १ | चौक सभा व सर्व प्रकारच्या जाहीर सभा | पोलीस विभाग | १. अर्ज<br>२. जागा मालकाचे संमतीपत्र<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला |
| २ | पोस्टर्स/ झेंडे सभेच्या ठिकाणी लावणे | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था | १. अर्ज<br>२. खाजगी जागा असल्यास मालकाचे संमतीपत्र<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला |
| ३ | खाजगी जागेवर जाहिरात फलक (कटआऊट वगळून) | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था | १. अर्ज<br>२. खाजगी जागेच्या मालकाचे संमतीपत्र<br>३. फलक लावल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. |
| | प्रचार वाहन परवानगी | | |
| ४ | फक्त उमेदवाराच्या मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रापर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी | १. अर्ज<br>२. वाहन मालकाचे संमतीपत्र<br>३. वाहन नोंदणीपत्र<br>४. वाहनचालक परवाना |
| ५ | उमेदवाराचे तात्पुरते प्रचार कार्यालय | पोलीस विभाग व निवडणूक निर्णय अधिकारी | १. अर्ज<br>२. जागा मालकाचे संमीपत्र<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत परवाना |
| ६ | हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरविणे | संचालक, नागरी विमान सेवा | १. अर्ज<br>२. जिल्हाधिकारी/ पोलीस आयुक्त नाहरकत<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेने आकारलेले शुल्क भरलेची पावती तसेच त्याचा ना-हरकत दाखला<br>४. P.W.D., Fire, Ambulance ची एनओसी |
| ७ | ध्वनिक्षेपकाची परवानगी | पोलीस विभाग | १. अर्ज<br>पोलीस ना-हरकत/ परवानगी |

निवडणुकीदरम्यान लागणारे विविध परवाने

| अ. क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी/ विभाग | परवानगीसाठी करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|
| ८ | मिरवणूक/ रोड शो | पोलीस विभाग | १. अर्ज<br>२.पोलीस ना-हरकत/ परवानगी |
| ९ | प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या जाहीरातींच पूर्वप्रमाणन | प्रसार माध्यम संनियंत्रण समिती<br>१.राज्यस्तरीय समिती - संपूर्ण राज्यात जाहीरात देणे.<br>२.जिल्हास्तरीय समिती - नगरपरिषद/ नगरपंचायत तसेच ग्रामीण स्था.स्व. सं.<br>३.महानगरपालिकास्तरीय समिती - महानगरपालिका निवडणुकांकरिता | राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०९/१०/२०२५ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार विहित नमुन्यात यथास्थिती राज्यस्तरीय/ जिल्हास्तरीय/ महानगरपालिका स्तरीय समितीकडे अर्ज करणे आवश्यक. |

परिशिष्ट-३

| भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदी | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कलम | कलमाची अनुषंगिक माहिती |
| १ | कलम १७० | मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते. |
| २ | कलम १७१ | निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे. |
| ३ | कलम १७२ | निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे. |
| ४ | कलम १७४ | निवडणुकीत अनुचित प्रभाव पाडल्याबाबत किंवा व्यक्तीरेखेबद्दल |
| ५ | कलम १७५ | निवडणुकीच्या संबंधात खोटे कथन करणे. |
| ६ | कलम १७६ | निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे. |
| ७ | कलम १७७ | निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे. |
| ८ | कलम १७० | मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते. |
| ९ | कलम १९७ | राष्ट्रीय एकात्मकतेला बाधा आणणारे वक्तव्य करणे, लिखाण करणे, अथवा कृती करणे यासाठी ५ वर्षासाठी शिक्षा व दंड होऊ शकतो. |
| १० | कलम २१२ | कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास खोटी माहिती देणे |
| ११ | कलम २१६ | शपथेवर खोटी माहिती देणे |
| १२ | कलम २२३ | सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास. |

| | | |
|---|---|---|
| १ | कलम ११ व ३१ | प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० |
| २ | कलम ३ व ४ | सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४ |
| ३ | कलम ३ ते ५ | महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, १९९५ |